# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 13.11.2025** **वार- गुरुवार**

---

**त्रिभाषा समिती**

राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आज पुण्यात संबंधित घटकांशी संवाद साधून त्यांच्या सूचना आणि प्रतिक्रिया जाणून घेतल्या. खासदार मेधा कुलकर्णी, आमदार बापूसाहेब पठारे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी, भाषातज्ज्ञ, विचारवंत, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि सामान्य नागरिकांनी यावेळी आपल्या सूचना सादर केल्या. या सूचनांचा सखोल विचार करण्यात येईल. तसंच tribhashasamiti.mahait.org या संकेतस्थळावर येणाऱ्या सूचनांचाही विचार करुन राज्य शासनाला डिसेंबर अखेर अहवाल सादर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असं डॉक्टर नरेंद्र जाधव यांनी सांगितलं.

**जिल्हा परिषद विद्यार्थी**

पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणारे निवडक 25 विद्यार्थी अमेरिकेतील नासा, केनेडी स्पेस सेंटरला भेट देण्यासाठी 10 दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर जाणार आहेत. हे सर्व विद्यार्थी उद्या मुंबईहून अमेरिकेकडे रवाना होतील, असं जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितलं. याआधी जिल्हा परिषद शाळेतील 50 विद्यार्थ्यांनी इस्त्रोचा दौरा पूर्ण केला आहे. 'पुणे मॉडेल स्कूल' प्रकल्पांतर्गत या शैक्षणिक दौऱ्याचं आयोजन करण्यात आलं आहे.

**सांस्कृतिक देवाण-घेवाण**

भारत आणि जर्मनी या दोन्हीं देशांमधील सांस्कृतिक देवाण घेवाण कार्यक्रमांतर्गत जर्मनीमधील काही विद्यार्थी सध्या पुण्यात आले आहेत. जर्मनीतील स्टुटगार्ट इथल्या अल्बर्टस मॅग्नस जिमनॅशियम या शाळेच्या विद्यार्थ्यांनी तसंच पुण्यातील एस.पी.एम. पब्लिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थी आणि शिक्षिकांनी आज आकाशवाणी पुणे केंद्राला भेट दिली. यावेळी दोन्ही शाळांच्या शिक्षिका उमा तडवळकर, ऋचा जोशी, हायके झिगमुंड पिलर आणि मिरियम लांगबेकर उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी उत्साहाने आकाशवाणी केंद्राची पाहणी केली, प्रसारणाच्या तांत्रिक बाबी जाणून घेतल्या, तसंच ध्वनिमुद्रण कसं केलं जातं हे स्टुडिओमध्ये जाऊन अनुभवलं.

**ओला कचरा**

पुणे शहरात दररोज तयार होणाऱ्या 1 हजार टन ओल्या कचऱ्यापैकी 600 टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. उरलेल्या 400 टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रियेसाठी आणखी प्रक्रिया प्रकल्प उभारणं गरजेचं आहे, असं पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी सांगितलं. लोणी काळभोर इथं वनविभागाच्या जागेत तसंच

शेतांमध्ये, प्रक्रिया न केलेला ओला कचरा मोठा प्रमाणात टाकला जात असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे आल्या आहेत. या संबंधीच्या प्रश्नाला उत्तर देताना त्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या. कचरा उचलण्यासाठी छोट्या गाड्यांची संख्या वाढवणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**पुणे ग्रँडटूर**

येत्या जानेवारी महिन्यात होणाऱ्या पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेसाठी निधीची आवश्यकता असल्याने पुणे महापालिकेतर्फे 136 कोटी रुपयांचं वर्गीकरण करण्यात आलं आहे. अंदाजपत्रकातील 338 कामांसाठीचा हा निधी देण्यात आला आहे अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त आणि पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी पत्रकारांना दिली. पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेचा मार्ग 450 किलोमीटर आहे, हा मार्ग पुणे जिल्हा, पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातून जातो. त्यापैकी पुणे शहरात 75 किलोमीटर लांबीचा मार्ग आहे. यामध्ये बाणेर, बालेवाडी, सेनापती बापट रस्ता, कर्वे पुतळा, पौड रस्ता, नांदेड सिटी आदी भागाचा समावेश आहे. या भागातील रस्त्यांचं डांबरीकरण, पादचारी मार्ग दुरुस्ती, मिसिंग लिंक रस्ते करणे, आदी कामांसाठी हा निधी वापरला जाणार असल्याचं पावसकर म्हणाले.

**लोकमान्य नगर**

पुणे शहराच्या मध्यवस्तीत जवळपास साडेसोळा एकरावर असणाऱ्या लोकमान्य नगरमधील इमारतींचा पुनर्विकास एकल पद्धतीने करायचा की एकात्मिकपणे, यावरुन स्थानिक रहिवाशांमध्ये वेगवेगळे मतप्रवाह आहेत. या संदर्भात स्थानिक रहिवाशांच्या नोंदणीकृत लोकमान्य नगर रहिवासी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच मुंबईमध्ये म्हाडाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. लोकमान्य नगरच्या एकात्मिक पुनर्विकासाच्या प्रक्रियेला गती देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यासंदर्भात लोकमान्य नगर रहिवासी संघाच्या सदस्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही निवेदन दिलं आहे.

**पिंपरी चिंचवड निवडणूक**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने, महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघांची मतदार यादी प्रभागनिहाय विभाजित करून प्रारूप मतदार यादी 14 नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर नागरिकांना हरकती आणि सूचना दाखल करण्यासाठी 22 नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. यासाठी क्षेत्रीय कार्यालयानिहाय अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 30 तर किमान तापमान 13 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**